THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 17TH APRIL 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम मुंबई, तारीख १३ माहे मार्च सन १८९०.

नंबर १८९४.—हिंदुस्तान सरकारचा खालीं दिलेला जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असे :—

### "होम डिपार्टमेंट.

पब्लिक.

मुक्काम कलकत्ता, तारीख ६ माहे मार्च सन १८९०.

नंबर ४९० —सन १८८४ चा हिंदुस्तानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट, कलम १८, पोट-कलम (१), यांतील ठरावांअन्वयें, आणि होम डिपार्टमेंटाचा जाहिरनामा नंबर १९६४, तारीख २ माहे सप्टेंबर सन १८८७, यांतल्या हकुमांअन्वयें, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं, बारी पदार्थ इकडून तिकडे पाठविण्याचें व ते बाहेरून आणण्याचें नियमन करण्याबाबतच्या ज्या कानू होम डिपार्टमेंटचा जाहिरनामा नंबर १४१७, तारीख २४ माहे जून सन १८८७, यांत प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांतल्या ६ व्या कानूच्या बदला दाखल करावयाची जी कानू सदरील आक्टाअन्वयें करावयाची योजिली आहे, तिचा खालीं दिलेला मसुदा सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला आहे. ह्या जाहिरनाम्याच्या तारिखेनंतर दोन महिन्यांनीं ह्या मसुद्याचा विचार केला जाईल.

#### ६ व्या कानूचा मसुदा.

रकम (इ) हींत नमूद केलेला अपवाद लागू राहून, या कानूंत यापुढें निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या बारी पदार्थांशिवाय इतर कोणताहि बारी पदार्थ, ह्या कानूंत ह्यापुढें निर्दिष्ट केलेल्या रीतीशिवाय इतर रीतीनें प्यासेंजर ट्रेनींतून (उतारूंच्या रेल्वेच्या गाडींतून) नेऊं नये :—

(अ) सेफ्टी काडतुसें व तोट्या व सेफ्टी फुज ( सुरुंग लावण्यासाठीं ), तसेंच, रेल्वेच्या उपयोगासाठीं धुक्याच्या निशाण्या; हे पदार्थ साधारण बागणांतून अगर गाड्यांतून नेण्यास हरकत नाहीं.

(ब) डायनामाईट; हा काडतुसांच्या रूपानें ९ रत्तलपर्यंत नेण्यास हरकत नाहीं; मात्र त्याच खणांतून डिटोनेटर्स नेऊं नयेत.

(क) डिटोनेटर्स; हे २०० पर्यंत नेण्यास हरकत नाहीं; मात्र इतकेंच कीं, ज्यांत डिटोनेटर्स आहेत अशा एका किंवा अनेक प्याकेजांतील पाऱ्याच्या फलिमनेटाचें प्रमाण एकंदरींत कोणत्याहि बाबतींत

३ औंसांहून अधिक असूं नये; (ज्या कंपनीनें, पेढीनें अगर इसमानें ते डिटोनेटर्स इकडून तिकडे पाठविण्याकरितां स्वाधीन केलेले असतील त्यानें किंवा तिच्या अगर त्याच्या मुखत्यारानें अशाविषयीं दाखला दिला पाहिजे), तसेंच, त्याच खणांतून डायनामाईट मुळींच नेऊं नये.

(ड) पूर्वी ठरविल्याप्रमाणें दुहेरी केसींत भरलेली अशी शिकारीच्या कामाची बंदुकीची दारू अगर नानसेफ्टी काडतुसें नेण्यास हरकत नाहीं; मात्र ती बंदुकीची दारू, एकरतली कथली डब्यांत भरलेली असून ते डबे, आंत ठिणगी मुळींच शिरणार नाहीं अशा रीतीनें बाहेरून कथलानें अगर जस्तानें मढविलेल्या मजबूत लांकडी केसींत, अगर रेलवे आडमिनिस्ट्रेशनानें पसंत केलेल्या नमुन्याअन्वयें बनविलेल्या व धातूनें मढविलेल्या केसींत प्याक केली असली पाहिजे. परंतु बाहेरील कोणत्याहि केसींत २९ रतलांहून जास्त बंदुकीची दारू असूं नये, व एका ट्रेनींतील बंदुकीच्या दारूचें अगर नानसेफ्टी काडतुसांचें कन्सैन्मेंट एकंदर मिळून ८० रतलांहून जास्त असूं नये.

(इ) ज्या लैनीवर गुड्स ट्रेनी चालू नसतील त्या लैनीवर मिक्सड ट्रेनींतून बारीपदार्थ नेण्याचा अधिकार आहे; मात्र अशा प्रसंगीं, एका मिक्सडट्रेनीबरोबर एकेच वेळीं बारीपदार्थ भरलेली एकाहून जास्त वागन पाठवूं नये, गुड्स ट्रेनींतून बारीपदार्थ नेण्याच्या संबंधानें ज्या अटी घालून दिल्या आहेत त्या पाळिल्या पाहिजेत, आणि लैनीच्या ज्या भागावर गुड्स ट्रेनी चालू असतील त्या भागावर मिक्सड ट्रेनीबरोबर बारीपदार्थांची वागन येतांच ती त्या मिक्सड ट्रेनीपासून वेगळी काढिली पाहिजे."

अलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

( सही) जे. न्युजंट,

चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट धाकीलनाव गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २१ माहे मार्च सन १८९० रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे :—

## सन १८९० चा आक्ट १२ वा.

सन १८८२ चा हिंदुस्तानचा तारिफासंबंधी आक्ट सुधारण्याबाबद आक्ट.

ज्याअर्थी सन १८८२ चा हिंदुस्तानचा तारिफासंबंधी आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी हल्लीं पुढील प्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१८८२ चा आक्ट ११ याच्या दुसऱ्या परिशिष्टाची सुधारणा.

१. सन १८८७ चा आक्ट ९ (सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट, सन १८८१ चा एक्सैज आक्ट आणि सन १८८२ चा हिंदुस्तानचा तारिफासंबंधी आक्ट सुधारण्याविषयीं आक्ट) यावरून सन १८८२ च्या हिंदुस्तानच्या तारिफासंबंधी आक्टाचें दुसरें परिशिष्ट सुधारलें आहे त्याचा नंबर २ यांत,—

(अ) "लिकूरच्या" प्रत्येक इंपीरियल ग्यालनावर किंवा सहा क्वार्ट बाटल्यांवर बसावयाचा व वसूल करावयाचा जकातीचा दर ह्मणून पांचव्या आसनांत "९ रुपये" या शब्दांबदल "६ रुपये" हे शब्द दाखल करावे; आणि

(ब) पुढील मजकुराबदल, ह्मणजे—

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येकीं. | तारीफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| ... | ... ... .. ... | ... ... | ... | ... ... ... |
| | शेंकडा वीस अगर ह्याहून जास्त या प्रमाणानें याप्रमाणें उपयोग केलेली गाळलेली दारू. | लंडन प्रुफचे कसाचे इंपीरियल ग्यालनास किंवा सहा क्वार्ट बाटल्यांस. | ... | ९ रुपये, आणि सदहू दारूचा कस लंडन प्रुफाहून जितका अधिक किंवा कमी असेल त्याप्रमाणें जकात वाढवावयाची किंवा कमी करावयाची. |
| | गाळलेली दारू, सुवासिक, पिंपांमध्यें अगर बाटल्यांमध्यें. | इंपीरियल ग्यालनास किंवा सहा क्वार्ट बाटल्यांस. | ... | ७ रुपये ८ आणे. |
| | गाळलेली दारू, इतर प्रकार. | लंडन प्रुफचे कसाचे इंपीरियल ग्यालनास किंवा सहा क्वार्ट बाटल्यांस. | ... | ९ रुपये, आणि सदहू दारूचा कस लंडन प्रुफाहून जितका अधिक किंवा कमी असेल त्याप्रमाणें जकात वाढवावयाची किंवा कमी करावयाची. |

या मजकुराबदल खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा; तो येणेंप्रमाणेः—

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येकीं. | तारीफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| ... | ... ... ... | ... ... | ... | ... ... ... |
| | शेंकडा वीस अगर ह्याहून जास्त या प्रमाणानें याप्रमाणें उपयोग केलेली गाळलेली दारू. | लंडन प्रुफचे कसाचे इंपीरियल ग्यालनास किंवा सहा कार्ट बाटल्यांस. | ... | ६ रुपये, आणि सदर्हू दारूचा कस लंडन प्रुफाहून जितका अधिक किंवा कमी असेल त्याप्रमाणें जकात वाढवावयाची किंवा कमी करावयाची. |
| | गाळलेली दारू, सुवासिक, पिंपांमध्यें अगर बाटल्यांमध्यें. | इंपीरियल ग्यालनास किंवा सहा कार्ट बाटल्यांस. | ... | ८ रुपये. |
| | गाळलेली दारू, इतर प्रकार. ... | लंडन प्रुफचे कसाचे इंपीरियल ग्यालनास किंवा सहा कार्ट बाटल्यांस. | ... | ६ रुपये, आणि सदर्हू दारूचा कस लंडन प्रुफाहून जितका अधिक किंवा कमी असेल त्याप्रमाणें जकात वाढवावयाची किंवा कमी करावयाची. |

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.